महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

किंमत २ रुपये

बुधवार | ०१ जानेवारी २०२५ | वर्ष ६ | अंक - १८६ | पाने - ४

## सौर कृषी वाहिनी प्रकल्पाला अधिक गती द्या

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा महाराष्ट्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम आहे. या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून काम करत असतांना प्रकल्प विकासकांना ज्या ठिकाणी अडीअडचणी येत असतील, तर संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा बैठक घेऊन त्या समस्या सोडवाव्यात. यासंदर्भातील अहवाल पुढील १५ दिवसांमध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० ची देखील आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाचे निर्देश दिले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबवितांना प्रकल्प विकासकांना आता ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याने नमुद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जमीन अतिक्रमीत झालेल्या ठिकाणी प्रकल्प विकासक तसेच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित बैठक घ्यावी. त्याचप्रमाणे विकासकांना येणाऱ्या अतिक्रमीत जमिनीसंदर्भात समस्या सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करा – मुख्यमंत्र्यांचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक मंगळवारी पार पडली असून यात जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबवली जावी असे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आली आहे. विशेष सहाय्याच्या योजनांचे अनुदान डिबीटी प्रणालीद्वारे वितरित करा, वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करा असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पुढील १०० दिवसांमध्ये सामाजिक न्याय विभागाने करावयाच्या कामाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला.**

जात पडताळणी प्रमाणपत्र काढण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. या प्रमाणपत्रासाठी सर्वसामान्यांना अनेकदा शासकीय कार्यालयांची पायरी चढावी लागते. शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना आपल्या गावी जावून पाठपुरावा करावा लागतो. अनेकदा याबाबतच्या कामांना अडचणी येत असल्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना देखील मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ऑफलाईन कामे करत असताना, काही वेळेला काही शासकीय कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल तर आपली फाईल तशीच जागेवर पडून राहते. पण ऑनलाईन अर्ज केला आणि किती दिवस आपल काम झालं नाही ते ऑनलाईन समजतं. ऑनलाईन असल्यामुळे सगळ्या गोष्टी पारदर्शकपणे समजतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करा, असे आदेश दिल्याने त्याचा सकारात्मक परिणाम पडलेला बघायला मिळू शकतो.

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमुळे राज्यातील पात्र निराधारांना दिलासा मिळतो. मात्र निराधारांना लाभ मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अर्थसाहाय्याचे वितरण हे थेट लाभ हस्तांतरण पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच जात पडताळणी प्रक्रिया आणि विद्यार्थी वसतीगृह प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्याचे निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

सह्याद्री अतिथीगृह येथे सामाजिक न्याय विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पाणीपुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सहकार राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

□□□□□□



# मुंबई विद्यापीठाकडून उन्हाळी परीक्षांच्या तारखा जाहीर




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या विविध विद्याशाखेअंतर्गत होणाऱ्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये पदवी स्तरावरील बीकॉम सत्र ६ ची परीक्षा १८ मार्च, बीएस्सी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च, बीए सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च २०२५ पासून सुरु होणार आहे. तर बीएस्सी आयटी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्ग स्वयंअर्थसहाय्यित विषयांची परीक्षा १८ मार्च, बीएमएम आणि बीएएमएमसी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च २०२५ रोजी घेण्याचे विद्यापीठामार्फत नियोजित करण्यात आले आहे.

विद्याशाखानिहाय मानव्य विज्ञान शाखेसाठी १४७२३, वाणिज्य शाखेसाठी ७४४८३, विज्ञान २७१३४, तंत्रज्ञान १३००४, विधी ८७२५ असे एकूण १ लाख ३८ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यामध्ये ७५३४६ मुले, ६२७१७ आणि इतर ६ एवढ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सातही जिल्ह्यातील एकूण ४३९ परीक्षा केंद्रांवर या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून ३ महिन्यापूर्वीच विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र आणि आसन क्रमांकाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे परीक्षा विभागाने विकसित केलेल्या डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून डिजिटल युनिव्हर्सिटी पोर्टल (DU portal ) यावर ३ महिन्यापूर्वीच विद्यार्थ्यांना त्यांच्या आसन क्रमांकासह परीक्षा केंद्र आणि परिक्षेची माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अधिकृत वेबसाइट https://mum.digitaluniversity.ac/ Know Your Exam Venue नुसार विद्यार्थ्यांना ही तंत्रस्नेही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून परीक्षा व निकाल विभागाचे उपकुलसचिव नरेंद्र खलाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उन्हाळी सत्र २०२५ च्या परीक्षांचे सुक्ष्म नियोजन केले असल्याचे संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले.

तसेच विद्यार्थ्यांचे विषय, आसन क्रमांक आणि अनुषंगिक तपशील याबाबतचे तात्पुरते प्रवेशपत्र महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असून, सर्व महाविद्यालयांनी या प्रवेशपत्रातील तपशील तपासून त्यातील काही दुरुस्ती असल्यास तात्काळ विद्यापीठाकडे संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले.

# एसआरएकडून भूसंपादनास टाळाटाळ

## ठाणे-बोरीवली ट्विन टनेल प्रकल्प रखडणार ?


**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईच्या पश्चिम उपनगरांना थेट ठाण्याशी जोडण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या ठाणे-बोरीवली ट्विन टनेल प्रकल्पाचे बोरीवली बाजूकडील भूसंपादन रखडले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून (एसआरए) या प्रकल्पाच्या जागेचे भूसंपादन अद्यापही अपूर्ण असल्याने या बाजूकडील भुयारीकरणाच्या कामाला सुरुवात झालेली नाही.

ही जागा मिळण्यास आणखी विलंब झाल्यास प्रकल्पाचे काम रखडणार आहे.

त्याबाबतचे पत्र एमएमआरडीएने एसआरएच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नुकतेच पाठविले आहे.

ठाणे- बोरीवलीदरम्यान संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून ११.८५ किलोमीटरच्या मार्गाची उभारणी एमएमआरडीए करत आहे. त्यात १०.२५ कि.मी.च्या बोगद्याचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी १८,८३८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. राज्य सरकारने या प्रकल्पाला महत्त्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्पाचा दर्जा दिला आहे. एमएमआरडीएने मेघा इंजिनिअरिंग या कंपनीला जून २०२३ मध्ये प्रकल्पाचे काम दिले आहे.



### .... तर प्रकल्पाच्या खर्चात वाढ

या प्रकल्पाची जागा मिळण्यास विलंब झाला तर प्रकल्प वेळेत पूर्ण होणार नाही. त्यातून प्रकल्पाच्या खर्चात वाढ होण्याची भीती आहे. त्यामुळे बोरीवली बाजूकडील जागा तत्काळ उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी एमएमआरडीएने एसआरएकडे केली आहे.

बोगदे : प्रत्येक दिशेच्या वाहतुकीसाठी प्रत्येकी ३ मार्गिकांचे दोन जुळे बोगदे - आता प्रकल्पाचे ठाणे बाजूकडील काम सुरु झाले असून कंत्राटदाराने भुयारीकरणासाठी टीबीएम मशीन बोगद्यात उतरविण्यासाठी शाफ्ट उभारणीचे काम सुरु केले आहे. मात्र, या प्रकल्पाची बोरीवली बाजूकडील भुयारीकरणापूर्वीची प्राथमिक कामेही सुरु झालेली नाहीत.

> - या भागातील कामे सुरु करण्यापूर्वी मागाठाणे येथील जय महाराष्ट्र नगर झोपडपट्टीच्या जागेची एमएमआरडीएला आवश्यकता आहे. या भागातील ५५० झोपड्या या प्रकल्पाने बाधित होणार आहेत. - दरम्यान, याबाबत एमएमआरडीए आणि एसआरएच्या अधिकाऱ्यांमध्ये डिसेंबर २०२३ मध्ये बैठक झाली होती. त्यानुसार आतापर्यंत संपूर्ण जागा एमएमआरडीएच्या ताब्यात येणे अपेक्षित होते.

> - मात्र, एसआरएने येथील झोपडपट्टीधारकांना स्थलांतरीत करुन या जागेचे अद्यापही भूसंपादन केलेले नाही, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.
> बाधित होणाऱ्या झोपड्या रिकाम्या करुन जागा एमएमआरडीएकडे हस्तांतरीत केल्याशिवाय या भागातील कामांना सुरुवात होणार नाही. ही जागा रिकामी केल्यानंतरच प्रकल्पस्थळी मशिनरी आणि वाहने घेऊन जाण्यासाठी एमएमआरडीएला रस्ता उभारता येणार आहे तसेच त्यानंतरच टनेल बोरिंग मशीन बोगद्यात उत्तरविण्यासाठी शाफ्ट उभारणीचे काम करता येणार आहे.




# उल्हासनगर मनपा पंधरा माळयांची होणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

उल्हासनगर : आयुक्त विकास ढाकणे यांनी २०२५ मध्ये विकासकामांचा आणि योजनांचा मिशन ५० चा संकल्प हाती घेतला आहे. या मिशन अंतर्गत ४८ वर्षांपूर्वीच्या उल्हासनगर महानगरपालिकेचे रूपांतर १५ माळयांच्या पिरॅमिड इमारतीच्या आकारात करण्यात येणार असून विद्यमान कार्यालय हे प्रांत कार्यालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या शासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याची प्रक्रिया हाताळली जाणार आहे. उल्हासनगर ही नगरपरिषद असताना ३ जून १९७६ रोजी दोन मजल्याच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले होते. पुढे १९९६साली नगर परिषदेला महानगरपालिकेचा दर्जा मिळाल्यावर कालांतराने तिसऱ्या मजल्याची निर्मिती करण्यात आली होती. आता मात्र या इमारतीला ४८ वर्षे झाल्याने ती धोकादायक ठरू लागली असून त्याची अनेकदा डागडुजी करण्यात आली आहे. त्यामुळे ही इमारत पाडण्याचा आणि त्यावर १५ माळयांची पिरॅमिड आकाराची इमारत शक्य तितक्या लवकर उभारण्याचा निर्धार आयु आयुक्त विकास ढाकणे यांनी केला आहे.

या इमारतीची डिझाईन सुप्रसिद्ध आर्किटेक्ट हितेन शेठी यांनी तयार केली असून त्यांनी नविमुंबई आणि पनवेल महानगरपालिकेच्या इमारतींच्या डिझाईन बनवलेल्या आहेत. २०२५ च्या सुरवातीच्या काही महिन्यात यादरम्यान कार्यालय हे प्रांत कार्यालयाच्या आवारातील शासकीय इमारतीमध्ये स्थलांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पालिकेचे ४८ वर्ष जुने कार्यालय पाडकाम करण्यास सुरवात केली जाणार आहे. त्यानंतर आयुक्त विकास ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, शहर अभियंता तरुण शेवकानी यांच्या देखरेखी खाली निविदा प्रक्रिया हाताळल्यावर ४१० कोटींच्या निधीतून पिरॅमिड आकाराच्या इमारतीच्या कामाला गती देण्यात येणार आहे.



# अंबरनाथ नगरपरिषदेचे मा. मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांचा 'शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात' विशेष सहभाग



पहिले राज्यस्तरीय 'शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन' दि. २० ते २२ डिसेंबर या काळात बाल गंधर्व पुणे येथे आयोजित करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे महानगरपालिका आणि संवाद, पुणे यांच्यावतीने हे संमेलन आयोजित केले.

यामध्ये विविध परिसंवाद, चर्चासत्रे, कवितासंमेलनातून सरकारी अधिकारी व्यक्त झाले. या संमेलनात आजी-माजी अधिकाऱ्यानी लिहिलेल्या पुस्तकांचे, चित्र- छायाचित्र प्रदर्शन, नव्या प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'यशदा' चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांची संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली तसेच पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले स्वागताध्यक्ष होते.

मराठी भाषेला नुकताच केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच राज्य शासनाने मराठी भाषा धोरण देखील नुकतेच जाहीर केले आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे लेखन साहित्य समाजापुढे यावे, यासाठी ही साहित्य संमेलनाने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या संमेलनामध्ये विशेष सहभाग म्हणून अंबरनाथ नगरपरिषदेचे मा. मुख्याधिकारी अभिषेक पराडकर हे उपस्थित होते ते शासकीय कामकाज सांभाळून साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात आपले सातत्याने योगदान देत आहे. एक अधिकारी आणि समाजाचा एक घटक म्हणून वावरताना भंवताली घडणाऱ्या अनेक चांगल्या वाईट घटनांची कुठेतरी खोलवर नोंद घेतली जाते. हे भवताल टिपताना मनात येणारे विचार शब्दात उतावरण्याचा प्रयत्न मा. मुख्याधिकारी अभिषेक पराडकर हे 'भवताल' या लघुकथा मालिकेतून फेसबूक वर करीत आहेत. सदर शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात त्यांनी 'कागद' ही कथा सादर केली. या कथेला २०२३ साली शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या लेखन स्पर्धेत पहिल्या क्रमांकाची उत्कृष्ठ कथा म्हणून पारितोषिक मिळाले आहे .

हे संमेलन सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले होते. विशेष म्हणजे एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने वरिष्ठ व सनदी अधिकाऱ्याना ऐकण्याची व भेटण्याची नामी संधी अधिकारी- कर्मचारी, नागरिक आणि पुण्यात स्पर्धा परीक्षेचे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळाली.

# अंबरनाथ नगरपरिषद कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/अंबरनाथ(प्रतिनिधी) :** मंगळवार, दिनांक ३१ डिसेंबर,२०२४ रोजी अंबरनाथ नगरपरिषद येथील स्थायी समिती सभागृह पहिला मजला येथे अधिकारी व कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

अंबरनाथ नगरपरिषदेचे सेवा निवृत्ती कर्मचारी सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक श्री.अमोल मानकर, आरोग्य विभागाचे कर्मचारी श्रीम.राजवती रवीलखन, श्रीम.राणी चिन्नायाटू, श्रीम.कनीअम्मा सुब्रमनी यांना अंबरनाथ नगरपरिषदेचे प्रशासक डॉ.प्रशांत रसाळ, मा.मुख्याधीकारी अभिषेक पराडकर, उपमुख्याधिकारी उमेश राऊत यांच्या उपस्थितीत सेवापुर्ती निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.यावेळी सेवानिवृत्त अधिकारी अमोल मानकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी सामान्य प्रशासन कर निर्धारक मेघा कदम, जनसंपर्क कर निर्धारक पर्यवेक्षक किमया पवार, जनसंपर्क अधिकारी महेंद्र नेर, सामान्य प्रशासन खातेप्रमुख अर्जुन पाटील, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी व पत्रकार उपस्थित होते.

# समाज परिवर्तनाच्या लढयात रमाईचा त्याग इतिहास न विसरण्यासारखा - नाना बागुल



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/उल्हासनगर(प्रफुल केदारे):** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील उपेक्षित वर्गाच्या उत्थानासाठी तदह्यात खर्च केली.

त्यांच्या संघर्षामुळे आज आम्हाला सामाजिक, राजकीय, आर्थिक, सुबत्ता व प्रतिष्ठा लाभलीय. परंतु स्वतः संसाराचा गाडा आपल्या खांद्यावर घेऊन आपल्या पतीला समाज परिवर्तनासाठी मोकळं करून देणाऱ्या रमाईचा त्याग इतिहास कधीच विसरू शकणार नाही. असे गौरवोद्गार रिपब्लिकन पक्षाचे उल्हासनगर शहर जिल्हा अध्यक्ष नाना बागुल यांनी काढले. ते टाऊन हॉल येथे बुद्धभूमी फाउंडेशन मध्ये उभं राहत असलेल्या भव्य ' रमाई स्मारका' च्या मदत निधी साठी आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

रमाईने स्वतःचं कुटुंब, लेकरांचं, आजाराचं दुःख उरात बाळगून बाबासाहेबांना उच्च शिक्षण व समाजकार्यास निरपेक्ष पणे मदत केली. त्यामुळे बाबासाहेब नऊ कोटी जनतेचे बाप व या देशाच्या संविधाना चे शिल्पकार बनू शकले. रमाईचा त्याग हा केवळ महिलाच नव्हे तर, तमाम देशासाठी आदर्शवत आहे. त्यामुळे बुद्धभूमी फाउंडेशन येथे त्यांचे उभं राहणारं स्मारक हे समाजाला कायम प्रेरणा देत राहील. म्हणूनच समाजाने यथाशक्ती या स्मारकासाठी मदत करणं ही आपली नैतिक जबाबदारी ठरते असेही बागुल पुढे म्हणाले.

येथे सुप्रसिद्ध आंबेडकरी गायिका कडूबाई खरात यांच्या भीम बुद्ध गीतांनी रसिक प्रेक्षकांची मनं जिंकली. या कार्यक्रमात आंबेडकरी चळवळीचे अनेक राजकीय, सामाजिक, कला, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी नाना बागुल यांनी स्वतः या स्मारक निधी साठी एक लाख रुपयाचा धनादेश स्मारक समितीकडे सुपूर्द केला. पुढील मदतीसाठीही बागुल परिवार सज्ज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी इंजी. गौतम बस्ते, नवीन गायकवाड, विजय हळदे, रोहिणी जाधव, साक्षी डोळस आदी उपस्थित होत्या.

# म्हारळ जलशुद्धीकरण केंद्रातील भीषण अपघातात कामगाराचा मृत्यू



## क्रेनच्या निष्काळजीपणामुळे कामगाराचा दुर्दैवी मृत्यू

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ उल्हासनगर(प्रतिनिधी)**

म्हारळ गावातील जल शुद्धीकरण केंद्रात काम सुरू असताना सुरक्षेच्या अनास्थेमुळे एका ३५ वर्षीय कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

क्रेन चालकाच्या निष्काळजीपणामुळे बबलू कनोजिया या कामगाराचा ३० फूट खोल टाकीत कोसळून जागीच मृत्यू झाला. ठेकेदार कंपनीने सुरक्षेची योग्य ती काळजी घेतली नसल्याचे समोर आले असून, या घटनेने कामगार सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

उल्हासनगर शहराच्या सीमेलगत असलेल्या म्हारळ एमआयडीसी जल शुद्धीकरण केंद्रातील टाकी क्रमांक तीनच्या ब्रीजच्या नूतनीकरणाचे काम सुरू होते. या कामासाठी मोठी क्रेन मागवण्यात आली होती. मात्र, कामगारांनी कोणताही निर्देश न देता क्रेन चालकाने निष्काळजीपणे ब्रीज उचलला. या क्रेनचा जोराचा झटका लागल्याने बबलू कनोजीया हे कामगार संतुलन गमावून थेट ३० फूट खोल पाण्याच्या टाकीत कोसळले. तातडीने त्यांना वर काढण्यात आले, पण दुर्दैवाने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

सदर काम ठेकेदारी कंपनीकडून सुरू होते. मात्र, या ठिकाणी कामगारांसाठी कोणत्याही प्रकारचे सुरक्षा उपकरणे किंवा उपाययोजना करण्यात आलेल्या नव्हत्या. ही ठेकेदार कंपनीची बेफिकीरीच या अपघातास कारणीभूत ठरली असल्याचे मत व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच टिटवाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

मृतदेह उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

क्रेन चालक आणि ठेकेदार कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास वेगाने सुरू आहे. या घटनेमुळे कामगार संघटनांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यांनी ठेकेदार कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सुरक्षेचा अभाव असल्याने अनेक कामगारांचे जीव धोक्यात येत असल्याचे त्यांनी अधोरेखीत केले.

# जयकुमार रावल यांची महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला भेट



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :** राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष श्री.जयकुमार रावल यांनी काल, दि.३० डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील सुविधांना भेट दिली. या भेटीवेळी पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.रावल यांनी सुविधेवर सुरू असलेले कामकाज याबाबतीत अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली. यावेळी कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक श्री.विनायक कोकरे व सुविधेवर काम करीत असलेले अधिकारी उपस्थित होते.

कृषी पणन मंडळाच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश, जपान, न्यूझीलंड, मलेशिया, दक्षिण कोरिया इ. देशांना कृषीमाल निर्यात करण्याकरिता आवश्यक असलेल्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्र, उष्ण बाष्प प्रक्रिया केंद्र व भाजीपाला प्रक्रिया केंद्र याबाबतीतील संपूर्ण माहिती सादर करण्यात आली. मंत्री तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ श्री.रावल यांनी याबाबतीत सुरू असलेल्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

या कामकाजाच्या चर्चेवेळी मंत्री श्री.रावल यांनी विकसित देशांची निर्यात कशा पद्धतीने वाढविता येईल याबाबत देखील चर्चा केली. भारत सध्या जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे आपल्याला आपल्यापेक्षा विकसित अमेरिका व चीन या देशांमध्ये कृषीमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीने केल्या जाते, याबाबतची माहिती प्राप्त करून घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचित केले. चीनमधील कृषी मालाच्या लागवडीखालील क्षेत्र हे भारताच्या लागवडीखाली क्षेत्राच्या तीन पट असून तेथे उत्पादित कृषीमालाचे मार्केटिंग कशा पद्धतीत केले जाते, याबाबत देखील अभ्यास करावा अशा सूचना केल्या. अतिदूरवरच्या देशांना समुद्रमार्गे कृषीमाल निर्यात करण्यासंदर्भात प्रोटोकॉल विकसित करण्यात आला असून रशिया येथे केळीची चाचणी कन्साईनमेंट पाठवण्यात आली व ही कन्साईनमेंट यशस्वीरित्या रशिया येथे पोहोचली आहे, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक श्री.विनायक कोकरे यांनी दिली. आपल्याला यापेक्षा देखील चांगल्या पद्धतीने कामकाज पुढे नेता येईल, याबाबत विचार विनिमय करण्याबाबत सूचित केले.महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारी २०२५ च्या सुमारास विविध कृषीमालाचे निर्यातदार व संबंधित घटकांची एकदिवशीय कार्यशाळा मुंबई येथे आयोजित करण्याबाबत पणन व राजशिष्टाचार मंत्री श्री.रावल यांनी सूचित केले आहे. या बैठकीवेळी विधानपरिषद सदस्य तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री.शशिकांत शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री.अशोक डक आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ.पी.एल.खंडागळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

# वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ ४२६ शिक्षकांना मंजूर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :** राज्यात २०१४ मध्ये सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला असून जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विभागातील ४२६ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाने शिक्षकांना मिळणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा करण्यात येत आहे. शिक्षण प्राथमिक विभागातील मुख्याध्यापक १६, पदवीधर शिक्षक ४८ व प्राथमिक शिक्षक ३६२ अशा एकूण ४२६ शिक्षकांना एका पदावर १२ वर्ष सेवा पूर्ण झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभ याबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घेत असल्याने शिक्षण विभागातील ४२६ शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत ११ शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया नोव्हेंबर, २००५ पूर्वी सुरू झाल्यामुळे ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या मात्र नोव्हेंबर २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू झालेल्या शिक्षकांना यापूर्वी परिभाषित अंशदान योजना लागू करण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाने एका याचिकेत या शिक्षकांच्या सेवेबाबत पडताळणी करून जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होते किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने संबंधित शिक्षकांची सुनावणी घेऊन कागदपत्रे पडताळणी अंती या ११ शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया नोव्हेंबर, २००५ पूर्वी सुरू झाल्यामुळे ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा महत्त्वपुर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत विशेष पाठपुरावा प्रत्येक सोमवारी आढावा बैठक घेऊन शिक्षकांचा बराच काळ प्रलंबित असलेले विविध प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न जिल्हा परिषदे मार्फत करण्यात येत आहेत. कामकाजाचा वेळोवेळी पाठपुरावा होत असल्याने ११ शिक्षकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# सौर उर्जा क्षेत्रात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची भरीव कामगिरी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदुराणी जाखड यांच्या नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या विद्युत विभागाने सौर उर्जा क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या १० प्रभाग क्षेत्र कार्यालया साठी एकूण १६० किलो वॅट क्षमतेची सौर उर्जा निर्मिती करणारी संयंत्रे कार्यान्वित केलेली आहेत. महापालिकेच्या मोहीली येथील जल शुध्दीकरण प्रकल्प व कपोते वाहनतळ येथे प्रत्येकी १२० किलो वॅट क्षमतेची सौर उर्जा निर्मिती करणारी संयंत्रे आस्थापित करण्यात आलेली आहेत.

महापालिकेच्या १५ इमारतींवर ०.४४ मेगा वॅट क्षमतेची सौर उर्जा संयत्रे आस्थापित असून प्रती वर्षी ६.३४ लक्ष सौर उर्जा युनिट उत्पादन होत आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सन २००७ पासून नविन इमारतीवर सौर उर्जा संयंत्रे उभारणे पासून बंधनकारक केलेले आहे, सौर उर्जा संयंत्रे उभारल्यानंतरच विकासक यांना नविन इमारतीसाठी नगररचना विभागाकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. सन २००७ ते २०२१ या कालावधीत १८३२ इमारतींवर १,१०,२२,५८५/- लिटर्स प्रती दिन क्षमतेच्या सौर उष्ण जल संयत्राची उभारणी विकासकाकडून करण्यात आली आहे. सौर उष्ण जल संयत्रामुळे महापालिका क्षेत्रातील इमारती मधील गरम पाणी करणेसाठी विजेचा भार कमी झाला असून दरवर्षी १८ कोटी पारंपारीक वीज युनिटची बचत होत आहे. सन २०२१ पासून नगरविकास विभागाच्या युनिफाईड विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली नुसार महानगरपालिका क्षेत्रातील नविन इमारतीवर सौर उर्जा निर्मिती करणारी सौर संयंत्रे बसविणे बंधनकारक केलेले आहे. सन २०२१ ते डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत एकूण १९४ नविन इमारतीवर ३.५ मेगा वॅट क्षमतेची सौर उर्जा निर्मिती करणारे सौर संयत्रे विकासकाकडून आस्थापित करुन घेण्यात आलेली आहेत. सौर उर्जा निर्मिती प्रकल्पातून दरवर्षी ५०.४० लक्ष सौर उर्जा वीज युनिटची निर्मिती होणार आहे. या हरित उर्जा निर्मितीतून इमारतीसाठी आवश्यक उदवाहन, वॉटर पंप,पॅसेज लाईट,आऊट डोअर लाईट या सामायिक बाबींसाठी आवश्यक विजेची गरज भागणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील शाळा, कॉलेज, रहिवासी संस्था, सरकारी कार्यालये, मॅराथॉन स्पर्धा, डोंबिवली जिमखाना उत्सव या सार्वजनिक ठिकाणी महापालिकेच्या विद्युत कर्मचाऱ्यांनी स्वतः तयार केलेल्या पथनाट्याचे एकूण २६ प्रयोग करुन सौर ऊर्जेबाबत जनजागृती केली. तसेच दि. १४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या राष्ट्रीय उर्जा संवर्धन सप्ताहात आकर्षक माहिती पत्रकांच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणी उर्जा संवर्धन व सौर उर्जा या बाबत मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात आली. सौर उर्जा ही हरीत उर्जा असून काळाची गरज आहे. सौर उर्जा संयंत्रे आस्थापित करणा-या नागरीकांना महापालिकेतर्फे दरवर्षी मालमत्ता करात १ टक्के सुट देण्यात येते, त्यासाठी नागरीकांनी सौर उर्जा संयंत्रे कार्यान्वित असल्याचा दाखला दरवर्षी महापालिकेत सादर करावा लागतो अशी माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

# 'युपीएससी' परीक्षेच्या मुलाखतीसाठी प्रशिक्षण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :** 'युपीएससी' तर्फे घेतल्या गेलेल्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२४ या परीक्षेचे निकाल घोषित झाले आहेत. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC) मुंबई येथे मुलाखत प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ.भावना पाटोळे यांनी कळविले आहे.

या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी राज्यातील विद्यार्थ्यांनी दि. २ जानेवारी २०२५ पूर्वी siac@1915@gmail.com या ई-मेलवर अर्ज करावेत. मुलाखत प्रशिक्षण नोंदणीसाठी www.siac.org.in या संकेतस्थळावरील सूचनांचे अवलोकन करावे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ येथे संपर्क साधावा असे संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांनी कळविले आहे.




**०१ जानेवारी २०२५**
**बुधवार**

**मेष**
माता आपल्या मुलांना काहीतरी नवीन शिकवतील, ज्यामुळे मुलांमध्ये नवीन कल्पना येतील. आज काही महत्त्वाची कौटुंबिक कामे होतील.

**वृषभ**
वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. आज तुमच्या कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल. तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल.

**मिथुन**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. आज तुम्ही केवळ कौटुंबिक कार्यात व्यस्त असाल.

**कर्क**
नातेसंबंध मजबूत होतील. दिनचर्या सुधारण्याची गरज आहे. आज तुम्ही व्यवस्थित राहिल्यास तुमचे काम वेळेवर पूर्ण होईल.

**सिंह**
मित्राचा सल्ला तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरेल.आपण कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू. आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल.

**कन्या**
आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.

**तूळ**
भावा - बहिणीं सोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृश्चिक**
तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. कोणतेही प्रकरण शांततेने सोडवण्याचा प्रयत्न करा.

**धनु**
विरोधी पक्ष तुमच्यापुढे झुकेल आणि तुमचे सोशल नेटवर्क मजबूत होईल. तुमच्या दिनचर्येत काही बदल होईल. जोखीम घेण्यापासून मागे हटू नका.

**मकर**
तुम्हाला तुमच्या संपर्कांद्वारे व्यवसायाशी संबंधित चांगली माहिती मिळेल. दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. कुटुंबातली भांडणे बाहेर येऊ देऊ नका.

**कुंभ**
तुम्ही संध्याकाळी मित्रांसोबत जास्त वेळ घालवाल. दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**मीन**
सुज्ञ व्यक्तीकडून तुम्हाला महत्त्वाचा सल्ला मिळेल. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची संधी मिळेल, लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील.

दैनिक जीवनदीप वार्ता
**मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.**
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
– E Mail –
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# डोंबिवलीतील शेकडो केमिस्ट बांधवांचा पोलीस स्टेशनवर हल्लाबोल



## पोलीस प्रशासनाला निवेदन सादर संघटनेच्या सर्व मागण्या मान्य

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** औषध विक्रेत्यास पोलिसांकडून जबरदस्ती दुकानातून बाहेर काढत दुकान बंद करण्याच्या निषेधार्थ शेकडो केमिस्ट बांधवांनी डोंबिवली पोलीस स्टेशनवर हल्ला बोल केला. आमदार राजेश मोरे, केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पोलीस प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. मेडिकल दुकान वर भविष्यात हेतूपूर्वक कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही असे आश्वासन सहायक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी यावेळी शिष्टमंडळ ला दिले. पोलीस प्रशासनाकडून संघटनेच्या सर्व मागण्या यावेळी मान्य करण्यात आल्या.

डोंबिवली केमिस्ट असोसिएशनचे चेअरमन निलेश वाणी, सचिव संजू भोळे, रेवाशंकर गोमतीवाल, विलास शिरूडे, राजेश कोरपे, लीना विचारे यांनी यावेळी प्रशासन समवेत चर्चा केली.

रात्रीच्या वेळी दुकानासमोर ग्राहकांची जास्त गर्दी होणार नाही याची दक्षता घेण्याची विनंती प्रशासनाने यावेळी केली. नशेखोर यांची दिवसेंदिवस गुन्हे करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याने रात्रीच्या वेळेस विनाकारण फिरणाऱ्या वर अंकुश बसने आवश्यक असल्याचेही पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी यावेळी सांगितले.

# मुरबाड आगारातील चालक वाहकांसाठी मोफत नेत्र तपासणी

## इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(बाळासाहेब भालेराव )** मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळ अंतर्गत येणाऱ्या सर्व वाहक चालक यांच्यासाठी मुरबाड शहरातील नामांकित इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबिर तसेच परिवहन महामंडळात कार्यरत असणाऱ्या सर्व वाहक चालक यांचा हॉस्पिटल च्या वतीने सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे असे आश्वासन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीधर ठाकूर यांनी दिले असून या उपक्रमात जास्तीत जास्त वाहक चालक यांनी



उपस्थित राहून आपल्या डोळयांची परिपूर्ण नेत्र तपासणी करून घ्यावी असे आवाहन मुरबाड आगाराचे आगार प्रमुख योगेश मुसळे व इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी केले आहे. सर्व वाहक चालक यांनी हॉस्पिटलला भेट देणे अनिवार्य असेल अभियानाच्या अधिक माहितीसाठी संपर्क रोहित झुंजारराव यांच्याशी साधावा.

## अजूनही येथे वाहिली जाते

# दोन हुतात्म्यांना भावपूर्ण आदरांजली

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी) :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीत चले जाव चे आंदोलन हे विशेष गाजले, भारतात ठिकठिकाणी स्थानिक पातळीवर आणि स्थानिक नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी क्रांतिकारी चळवळी उभ्या राहिल्या, त्यामध्ये कर्जत मुरबाड भागात ॲड, भाई कोतवाल यांच्या नेतृत्वाखाली आझाद दस्ता ही क्रांतिकारी चळवळ उभी राहिली होती, या चळवळीचा शेवट मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या बलिदानाने झाली, २ जानेवारी १९४३ रोजी ब्रिटिश पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ह्या दोन वीरांना वीरगती प्राप्त झाली,ह्या ऐतिहासिक घटनेला ऐशी वर्ष पूर्ण होत आहेत ,गेली ऐशी वर्ष येथे वीरांना दरवर्षी हजारो देशप्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत भावपुर्ण आदरांजली वाहिली जाते, राष्ट्रभक्तीचा हा झरा अखंड वाहत आहे,

कर्जत तालुक्यातील माथेरान येथील भाई कोतवाल आणि मानिवली येथील गोमाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश सरकारला हादरा देण्याचा उद्देशाने आझाद दस्ता ही चळवळ उभी राहिली होती, रेल्वे चे रूळ उखडणे, टेलिफोन च्या तारा कापणे, पोलीस चौकीला आगी लावणे, विजेचे खांब पाडणे, सरकारी दारुगोळा




लुटणे ह्या सारख्या कारवाया करून ब्रिटीश सरकारला जेरीस असणाऱ्या ह्या गटात राघो भगत, हिपरू गवळी, हिराजी पाटील, रामलाल श्रीवास्तव, हरी नारायण देशमुख, भास्कर पिंगळे, दगडू शहा, चंदू देहेरकर, मारुती शेलार असे अनेक वीर सामील झाले होते, भूमिगत कार्यरत असलेल्या ह्या वीरांनी मुरबाड मधील सिद्धगड येथील जंगलाचा आसरा घेतला असता फितुरीने घात होऊन २ जानेवारी १९४३ च्या पहाटे ब्रिटिश कॅप्टन हॉल याने केलेल्या गोळीबारात भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना वीरगती लाभली, २ जानेवारी १९४६ ला साने गुरुजींच्या हस्ते ह्या विरभूमीत पहिली क्रांतिज्योत पेटवली,ही परंपरा आजही तशीच सुरू आहे, १ जानेवारीच्या रात्री ठाणे ,रायगड जिल्ह्यातील शाळा, कॉलेज चे विद्यार्थी, देशप्रेमी नागरिक आणि स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक यांच्या उपस्थितीत ही क्रांतिज्योत पेटवली जाते, देशभरात कुठेच एवढ्या मोठ्या उत्साहात

> **हुतात्मा भाई कोतवाल यांच्या ह्या लढ्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा ह्या उद्देशाने मी ह्या लढ्यावर आतापर्यंत आठ पुस्तके प्रकाशित केली आहेत, आज तळागाळात भाई कोतवाल यांच्या लढ्याची माहिती पोहचली आहे, हे ठिकाण पर्यटन स्थळ न होता धारातीर्थ व्हावे ,ह्यासाठी शासनाने लक्ष केंद्रित करावे असे वाटते,**
> **- गिरीश कंटे,सिद्धगड लढ्याचे अभ्यासक व लेखक**

हुतात्म्यांना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम होत असेल ,तेवढा मोठा कार्यक्रम सिद्धगड च्या जंगलात बरोबर पहाटे ६ वाजून १० मिनिटांनी हा कार्यक्रम केला जातो, ह्या ठिकाणी क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, तारा बाई वर्तक, शांताराम घोलप, शाबीर शेख, अशा लोकांनी हजेरी लावली आहे, सिद्धगड स्मारक समितीच्या वतीने हा कार्यक्रम दरवर्षी साजरा केला जातो, ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री, मतदार संघाचे , आमदार ,खासदार,तहसील दार, हे दरवर्षी नचूकता हजर राहतात, ह्या ठिकाणी रात्रभर विविध समूह गायन स्पर्धा, वक्तृत स्पर्धा होत असतात, गेली८१ वर्ष ही परंपरा सुरू आहे,

### जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे

# रक्तदान महायज्ञाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान तर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील दिनांक ४ ते १९ जानेवारी पर्यंत रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात सिकलसेल ॲनेमिया, हिमोफिलीया, चॅलेसेमिआ, ब्लड कॅन्सर, किडनी फेल्युअर पेशंट जास्त आढळतात. अशा रुग्णांना वारंवार रक्ताची नितांत आवश्यकता असते. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढ्यांना रक्तबाटल्या देण्याचे या संप्रदायामार्फत निश्चित केले आहे. कल्याणसह टिटवाळा, डोंबिवली, भिवंडी परिसरात ५ ते १९ जानेवारी या कालावधीत विविध २१ ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली असून जास्तीत जास्त नागरीकांनी रक्तदान करण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

## जि.प. शाळा पारोळा येथील

# गुणवंत विदयार्थ्यांना बक्षिसे भेट



## राज्य शिक्षक मनवंतराव साळुंखे यांचा स्तुत्य उपक्रम

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** महावितरण कंपनीत विविध नियमित मंजूर रिक्त पदावर सुमारे २४ हजार वीज कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना शासनाकडून किमान वेतन जाहिर केले जाते व या अनुसार कामगारांचा ई.एस.आय.सी व भविष्य निर्वाह निधी भरण्यासाी एक विशिष्ट रक्कम दिली जाते जीला शासकीय संविधानिक देय रक्कम असे म्हटले जाते. मात्र मागील अनेक जिल्ह्यात महावितरण कंपनीत या शासकीय संविधानिक देय रक्कमेचा काही प्रशासकीय अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमताने अपहार केल्याचे संघटनेच्या निदर्शनास आले असून काही जिल्ह्यात संघटने कारवाई चालू केली असून आता प्रशासनाने सर्व जिल्ह्यात याची स्वतः सुमोटो कारवाई करावी अशी मागणी महामंत्री सचिन मेंगाळे यांनी केली.

अनेक जिल्ह्यात पूर्ण किमान वेतन दिले जात नसून बोगस कामगार, अनेक पत संस्थेत बोगस खाती काढून अब्जावधी रुपयांची लूट चालवली आहे. हे रोखण्यास राष्ट्रीयकृत बँक ऑफ इंडिया सोबत संघटनेने चर्चा केली असून याचा लाभ तिन्ही वीज कंपनीतील ४२ हजार कंत्राटी कामगारांना होणार असून या योजनेत सर्वांना ५० लाखाचा अपघात विमा मिळेल. लवकरच ही खाती उघडण्याचा उद्घाटन समारंभ होणार असल्याचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात यांनी कळवले. यासाी पुण्यातील बँक ऑफ इंडियाचे अंकुश पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे कोषाध्यक्ष सागर पवार यांनी सांगितले.

# क्षेत्रस्तरित निरंकारी बाल संत समागम संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनानुसार संत निरंकारी सत्संग भवन, कळवा, ठाणे येथे रविवारी आयोजित ‘निरंकारी बाल समागम’ मोठ्या हर्षोल्हासपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या समागमामध्ये ठाणे ते दिवा परिसरातील निरंकारी सत्संगामधील बालकांनी व त्यांच्या पालकांनी मिळून सुमारे दोन हजार भाविकांनी भाग घेतला.

या बाल संत समागमात मुख्य मंचावरुन आपले विचार व्यक्त करताना आगरा येथून आलेले निरंकारी प्रचारक शिखर महेन्द्र म्हणाले, की सत्संगमध्ये आपल्याला मनाचे भोजन प्राप्त होते. मनामध्ये प्रेम, नम्रता, सहनशीलता




यांसारख्या दिव्य गुणांचा विकास होतो. निरंकारी बाल सत्संगमध्ये मुलांना जी सकारात्मक ऊर्जा व शिकवण प्राप्त होते त्यातून ती मुलं जीवनातील चढ-उतारांमुळे विचलीत होत नाहीत. प्रत्येक परिस्थितीचा सामना करण्याचे मनोबल त्यांना प्राप्त होते.

या अगोदर विविध शाखांमधून आलेल्या बाल सत्संगातील मुलांनी सम्पूर्ण हरदेव बाणीतील पावन पदांचे गायन, हिंदी, मराठी, इंग्रजी व भोजपुरी भाषांमध्ये में भक्तिगीतं तसेच अनेक भाषांतून कविता सादर केल्या. या शिवाय मिशनच्या शिकवणूकीवर आधारित नृत्यगीते आणि लघुनाटिकाही प्रस्तुत केल्या ज्याचे श्रोत्यांनी तोडभरुन कौतुक केले.या समागमामध्ये बाल प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले होते ज्याचा विषय होता- ‘विस्तार - असीम की ओर’. या बाल प्रदर्शनीमध्ये मिशनच्या शिकवणूकीवर आधारित अनेक मॉडेल्स मुलांकडून मांडण्यात आले होते आणि या मॉडेल्समधून जी शिकवण घ्यायची आहे तीही प्रदर्शनीच्या प्रेक्षकांना मोठ्या तन्मयतेने मुलांकडूनच समजावली जात होती. या बाल समागमात विविध शाखांतील मुलांनी मुख्य अतिथींचे स्वागत केले.

कार्यक्रमामध्ये सेक्टर संयोजक डॉ. आर.एस.यादव व सुभाष भोसले यांच्यासह अनेक शाखांचे मुखी व सेवादल अधिकारी आणि बाल सत्संग इंचार्ज उपस्थित राहून बालकांना मार्गदर्शन करत होते. या व्यतिरिक्त मुंबई, वडाळा, वाशी व भाईंदर येथेही याच दिवशी क्षेत्रस्तरिय बाल संत समागमांचे आयोजन करण्यात आले होते.

# नववर्षाचे औचित्य साधून आजोबा गडावर स्वच्छता मोहिम

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** शंभुदुर्ग संघटनेच्या वतीने दरवर्षी नवीन वर्षाचे निमित्त साधून दोन दिवसीय गडकिल्ले स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा संघटनेच्या वतीने शहापूर तालुक्यातील आजोबा गडावर स्वछता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यभरातील शेकडो शिवभक्तांनी या मोहिमेत उत्स्पूर्त सहभाग नोंदविला असुन, या मोहिमेत



स्वच्छता व संवर्धन कार्यासोबत हिंदू धर्मरक्षणाच्या अनेक मुद्यांवर संघटनेच्या वतीने चर्चा करण्यात आली.

आजोबा गड हा प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या भूमीत रामायण रचीते महर्षी वाल्मिकी ऋषींची समाधी असून सितामाई पाळणा, लव कुश जन्मस्थान म्हणुन प्रसिद्ध असलेल्या हिंदूंच्या भूमीत मोहिमेत महाराष्ट्र सरकार व भारत सरकार यांना हिंदू धर्मासंदर्भात असलेल्या कायद्यांत बदल करण्याची सुचना वजा मागणी गडावरून फलक झळकावत व विडिओच्या माध्यमातून करण्यात आली.सनातन बोर्ड तयार करणे, लवजिहाद कायदा कडक करणे, धर्मांतर कायदा कठोर करणे, हिंदू मंदिर शासन मुक्त करणे, गड किल्ले संवर्धन महामंडळ तयार करणे आशा अनेक कायद्यांत सुधारणा करण्याचे निवेदन लवकरच सरकार कडे देण्यात येईल अशी माहिती शंभुदुर्ग संघटना प्रमुख आदेश चौधरी यांनी दिली.

## गरीब विद्यार्थ्यांना मदतीसाठी

# ‘गुलझार द लिजेंड’ कार्यक्रमाचे आयोजन

स्पंदन संस्थेच्या निधी उभारणीसाठी सुप्रसिद्ध कवी व गीतकार गुलजार यांच्या गाण्यांवर आधारित ‘गुलझार द लिजेंड’ हा कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)** गरीब परंतु हुशार मुलांना शैक्षणिक मदत करण्याच्या हेतूने स्थापन झालेल्या स्पंदन संस्थेच्या निधी उभारणीसाठी सुप्रसिद्ध कवी व गीतकार गुलजार यांच्या गाण्यांवर आधारित ‘गुलझार द लिजेंड’ हा कार्यक्रम शनिवार दिनांक ११ जानेवारी रोजी रात्री ८.३० वाजता कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात आलोक काटदरे, धनश्री देशपांडे सोनाली कर्णिक तसेच डॉ जय आजगावकर यांसारखे दिग्गज गायक असून ज्येष्ठ सुप्रसिद्ध सिने पत्रकार अंबरीश मिश्र यांचे निवेदन लाभणार आहे.

गेले १६ वर्ष स्पंदन तर्फे गरीब पण हुशार अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती स्वरूपात मदत केली जाते. संस्थेने आजवर जवळ जवळ ३०० मुलांना मदत केली आहे. तसेच आदिवासी पाड्यावरील काही शाळांना वस्तू स्वरूपात देखील मदत केली आहे. याच उपक्रमातील भाग म्हणून निधी उभारणीसाठी हा कार्यक्रम आयोजित केला असून संस्थेचा हा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन हे देणगीदार तसेच गरजू विद्यार्थी यांपर्यंत पोहचण्याचे एक माध्यम आहे असे संस्थेचे एक सदस्य प्रशांत दांडेकर यांनी सांगितले.

संस्थेच्या आत्तापर्यंतच्या कार्यक्रमास जसा प्रतिसाद कल्याणकरानी दिला तसाच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल व अनेक जण आमच्या या उपक्रमात सहभागी होतील अशी अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष महेश करंबेळकर यांनी व्यक्त केली. संपर्क प्रशांत दांडेकर ९८२०५७८२९८, महेश करंबेळकर ९८३३१ ६२३८१

# अधिकाधिक सदस्य नोंदणीसाठी नियोजनबध्द अभियान राबवा

## - माजी आमदार नरेंद्र पवार




## भाजपच्या ठाणे विभागीय कार्यालयात झाली सदस्यता नोंदणी कार्यशाळा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)** भारतीय जनता पक्षाकडून राज्यस्तरावर सदस्यता नोंदणी अभियान राबविण्यात येत असून ठाणे विभागीय क्षेत्रामध्ये अधिकाधिक सदस्यता नोंदणी होण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखण्याच्या सूचना भाजपच्या सदस्य नोंदणी अभियानाचे ठाणे शहर जिल्हा प्रभारी आणि माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केल्या. राज्य पातळीवरील या सदस्य नोंदणी मोहिमेअंतर्गत भारतीय जनता पक्षाच्या ठाणे जिल्हा विभागीय कार्यालयात सदस्यता नोंदणी कार्यशाळा संपन्न झाली. त्यामध्ये उपस्थित भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पवार यांनी विविध सूचना केल्या.

केंद्र सरकारकडून सुरू असलेली गतिमान विकासकामे आणि दूरगामी परिणामकारक ध्येयधोरणांची अंमल बजावणी केली जात आहे. या गोष्टींनी प्रेरित होऊन देशभरात अनेकजण भारतीय जनता पक्षाचे सदस्य होण्यासाठी स्वतःहून पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर आपण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत हे सदस्य नोंदणी अभियान घेऊन जाण्याची गरजही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

तर येत्या काळात प्रस्तावित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता त्यासाठीही प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आतापासूनच तयारीला लागले पाहीजे. आणि त्यासाठी हे सदस्य अभियान अत्यंत महत्त्वाचे असून परिणामकारक अमंलबजावणीसाठी त्याची नियोजनबध्द आखणी करण्याच्या सूचनाही पवार यांनी उपस्थित भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिल्या.

यावेळी ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, नौपाडा मंडल अध्यक्ष विकास घांगेकर, भटके विमुक्त प्रदेश उपाध्यक्ष बाळा केंद्रे, माजी नगरसेवक सुनील हंडोरे, ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष सुरेश पाटील, प्रभाग अध्यक्ष विलास हरपाळ, रोहित गोसावी, प्रतीक सोळंकी यांच्यासह शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोणी गावाबाहेरील मुसलमानांना नमाजास बंदी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ डोंबिवली(प्रतिनिधी) :** : कल्याण तालुका अंतर्गत असलेल्या शहर व गांवखेड्यात दिवसेंदिवस लैंगिक अत्याचार, गुन्हेगारीच्या वाढत्या घटना होत. परिणामी खोणी गावात कोणत्याही प्रकारच्या वाईट घटना होवू नयेत याची खबरदारी म्हणून येथील ग्रामस्थांनी गावामधील मस्जिदीमध्ये गावातील मुस्लिम समाजा खेरीज बाहेरून येणाऱ्या मुस्लिम धर्मियांना नमाजास बंदी करण्याचा निर्णय घेतला. याविषयी खोणी गावात सोमवारी ग्रामसभा घेण्यात आली होती. या ग्रामसभेत गावाबाहेरील मुस्लिमांना गावातील मासिदीमध्ये नमाजास बंदीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारित झाल्याचे सभा अध्यक्ष हनुमान ठोंबरे यांनी सांगितले. हा प्रस्ताव संबंधित पोलिसांना देण्यात येणार आहे.

शुक्रवारच्या बंदीच्या निर्णयामुळे खोणी गावहद्दीत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शुक्रवारी नेहमीप्रमाणे खोणी गाव हद्द परिसरातील मुस्लिम धर्मिय नमाज पठणासाठी खोणी गावाच्या वेशीवर आले. त्यावेळी खोणी ग्रामस्थांनी त्यांना संयमाने वस्तुस्थिती सांगून गावात प्रवेश करण्यास मज्जाव केला. सध्या तालुक्यात हत्या आणि वाढती गुन्हेगारी विचारात घेऊन गावातील महिला, मुली, लहान बाळांची सुरक्षितता महत्वाची असल्याने खोणी



ग्रामस्थांनी बाहेरील मुस्लिम धर्मियांना गावात येण्यास शुक्रवारी प्रतिबंध केला होता. खोणी गाव पलावा, दहिसर, मोरी हे मुंब्रा परिसराच्या जवळील भाग आहे. त्यामुळे प्रत्येक शुक्रवारी खोणी गावातील मस्जिदीमध्ये दुसऱ्या विभागातील मुस्लिम समाजातील नागरिक नमाजासाठी येतात. खोणी गावातील मुस्लिमांना खोणी गावात असलेल्या मस्जिदीमध्ये नमाज पठणासाठी येथील ग्रामस्थांचा विरोध नाही. त्यांनी नियमितपणे त्यांचे धार्मिक कार्य करावे, त्याला आमचा विरोध नाही. फक्त बाहेरून येणाऱ्या मुस्लिमांना आमचा विरोध आहे असे खोणी ग्रामस्थ सांगतात.

कल्याण, डोंबिवली, दिवा ग्रामीण हद्दीतील बेकायदा चाळी, वस्त्यांमध्ये बांगलादेशी, नायजेरियन नागरिक राहण्यास आले आहेत. त्यामुळे गावांतील नागरिकांमध्ये वातावरण अस्वस्थ आहे. मुंबईतील मोठ्या गुन्ह्यातील गुन्हेगार कल्याण तालुक्यातून अटक केले जात आहेत. म्हणून गावात शांतता रहावी म्हणून हा निर्णय झाल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत.

या विषयी ग्रामस्थांचा अर्ज प्राप्त झाल्यानुसार सोमवारी खोणी गावाची ग्रामसभा आयोजित केली होती. त्यामध्ये विषय असा होता की, आमच्या गावामध्ये शुक्रवारच्या नमाजसाठी बाहेरून येणार मुस्लिम लोंढा हा गावामध्ये घातक ठरत होता. गावातील महिलांच्या लहान बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. आज पहाता बांगला देश मध्ये होणारे हिंदूंवर अत्याचार होत आहेत त्यानुसार आम्ही बांगलादेशी मुसलमान असतील किंवा बाहेरून येणारे मुसलमान असतील त्यांना आम्ही गावबंदी केलेली आहे. आमचा स्थानिक मुस्लिम बांधवांना नमाज पठण करण्यास कोणत्याही प्रकारचा विरोध नाही. त्यांनीही सांगितले आहे की आमच्या मशिदीमध्ये जागा अपुरी पडत आहे. त्यांनीही त्यांच्या लेटर हेड वर पत्र दिले आहे की, आमचाही बाहेरील मुस्लिमांना विरोध आहे, कोणत्याही प्रकारचे सहकार्य राहील. आम्ही वर्षोनुवर्षे गावात बंधूप्रेमाने रहात आहोत तसेच आम्ही राहणार आहोत. याच विषयी ग्रामसभा आयोजित केली होती. ग्रामसभेला ७०० ते ८०० लोकं हजर होते. गावाच्या सुरक्षेसाठी हा ठराव मंजूर केला आहे. पोलीस प्रशासनाला या विषयी झालेला ठराव देणार आहोत अशी माहिती ग्रामपंचायत सदस्य हनुमान ठोंबरे यांनी दिली.



## राधिका ज्ञानेश वैद्य हिला विज्ञान प्रदर्शन प्रकल्पास सर्वोत्कृष्ट पारितोषिक

सोमवार दिनांक ३०/१२/२४ आणि मंगळवार दिनांक ३१/१२/२४ रोजी Achievers College कल्याण येथे झालेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. आपल्या शाळेतील विद्यार्थीनीही विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळालेला प्रकल्प सादर केला होता. इयत्ता सहावीतील ओम घाटवळ आणि राधिका वैद्य यांनी प्रकल्पाचे नेतृत्व केले होते. तसेच प्रकल्प बनवण्यासाठी कौमुदी शितोळे, दिपीका कांबळे आणि ज्ञानेश्वरी गोरे यांनी सहकार्य केले होते. या विज्ञान प्रदर्शनात प्रकल्पास सहभाग प्रमाणपत्र मिळाले तर राधिका ज्ञानेश वैद्य हिला प्रकल्प सादरीकरणाचे सर्वोत्कृष्ट पारितोषिक मिळाले.तसेच उल्लेखनीय बाब म्हणजे सर्व विद्यार्थ्यांच्यावतीने तिने व्यक्त केलेले मनोगत ऐकून प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे ॲडिशनल कमिशनर हर्षल जाधव यांनी राधिकाचे कौतुक करून त्यांच्या खिशात बाळगत असलेले पेन त्यांनी तिला भेट दिले. तिच्या या कामगिरीबद्दल तिचे, तिच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन.

## विद्यार्थ्यांनी कर्तव्य पाळली तर समाज सुधारणा निश्चित

### – पोलिस उपनिरीक्षक मनेश बच्छाव



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ पेण(प्रतिनिधी)**

आपली समाज व्यवस्था ही कायदा अन नियमावरती जोपासली जात आहे. ज्याप्रमाणे आपण नियम आणि कायदे पाळतो त्याचप्रमाणे आपण प्रत्येकाने समाजप्रती असलेली कर्तव्य ओळखून वागल्यास देश सुधारण्यासाठी त्याचा निश्चितपणे चांगला उपयोग होऊ शकतो. त्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपली कर्तव्य पाळली तर समाज सुधारणा ही निश्चितच झाल्याशिवाय राहणार नाही असे रोखठोक प्रतिपादन पोलीस उपनिरीक्षक मनेष बच्छाव यांनी कळंबोली येथे केले.सुधागड विद्या संकुलाच्या पाच दिवसीय सुरू असलेल्या स्नेह संमेलनाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक मनेश बच्छाव हे उपस्थित होते .त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी माजी मुख्याध्यापक,कवी ॲड. चंद्रकांत मढवी,कळंबोली व्यापारी संघाचे अध्यक्ष कमल कोठारी, माजी नगरसेविका विद्या गायकवाड सामाजिक कार्यकर्ते सुभाष गायकवाड ,विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, मराठी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वनिता कोळी, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रमुख संजय पाटील,तसेच विद्या संकुलातील शिक्षकेतर प्राध्यापक विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राथमिक विद्यालयातील चिमुकल्यांनी विविध गुणदर्शन करून आपल्या कला सादर केल्या. विविध गाण्याच्या ठेक्यावर समुह नृत्य करून उपस्थित मान्यवरांची दाद मिळवली. विद्या संकुलातील उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या विविध गुणदर्शन करून कला प्रदर्शित केले .विविध चित्रपटातील गाण्यांच्या ठेक्यावर समूह नृत्य करून स्नेहसंमेलनाचा समारोप हा दणकेबाज केला . समारोप प्रसंगी साहित्यिक व कवी चंद्रकांत मढवी यांनी तरुण वयात आलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी कसे वागावे याबाबतचे एक सुंदर व मार्गदर्शक कविता सादर केली.यावेळी विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी सुधागड विद्या संकुलातील सर्व शिक्षक ,शिक्षकेतर, प्राध्यापक ,कर्मचाऱ्यांचे तसेच उपस्थित झालेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त करून अंकुर शीर्षक ने प्रेरित झालेल संमेलन हे निश्चितच सर्वांच्या साक्षीने सर्वांच्या मेहनतीने उठावदार ,दिमाखदार झाल्याचे समाधान व्यक्त केले.

## वाचन संस्कृती वाढवण्यासाठी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रम

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ मुंबई(प्रतिनिधी)**

तरुण पिढीला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करणे आणि वाचन संस्कृती वाढवण्यासाठी राज्यात १ ते १५ जानेवारी दरम्यान 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम दरवर्षी राबवण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. हा उपक्रम सार्वजनिक ग्रंथालयांच्या माध्यमातून राबवण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत दि. ३० डिसेंबर रोजी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांच्या हस्ते स्पर्धा परीक्षा व मान्यवर लेखकांच्या ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले. १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई येथे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, ग्रंथालयातील वाचक यांना त्यांच्या आवडीनुसार पुस्तके वाचन करण्याचा सामूहिक उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण व पुस्तक कथन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मुंबई शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट व सामूहिक ग्रंथ वाचन कार्यक्रम, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन कौशल्य कार्यशाळा, विद्यार्थी - लेखक परीसंवाद अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत असून यामध्ये राज्यातील महा विद्यालये, विद्यापीठे, सार्वजनिक ग्रंथालये याठिकाणीही हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले आहे.तरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन वाचन संस्कृती वाढविण्यामध्ये योगदान द्यावे असे आवाहन राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या ग्रंथपाल शालिनी इंगोले यांनी केले आहे.

## ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा म्हणून शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहण घुगे यांचे मार्गदर्शना खाली दिनांक ०२ जानेवारी २०२५ ते ०३ जानेवारी २०२५ या कालावधीत न्यू इंग्लिश स्कूल, कळवा, जि. ठाणे येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

विज्ञान प्रदर्शनाचा मुख्य विषय शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान असा निश्चित केला असून यामध्ये अन्न, आरोग्य आणि स्वच्छता, वाहतुक आणि दळणवळन, नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन, संसाधन व्यवस्थापन या ७ विषयावर विद्यार्थ्यां मार्फत प्रदर्शनीय साहित्याची मांडणी केली जाणार आहे.

महानगरपालिका व तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनामध्ये शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाला पूरक असे विशेष प्राविण्य प्राप्त व समाजासाठी उपयुक्त असे प्रकल्प जिल्हा स्तरावरील प्रदर्शनामध्ये मांडणी केले जाणार आहे. या प्रदर्शनात इ. ६वी ते १२वी मधील विद्यार्थी सहभागी होणार आहेत त्या विद्यार्थ्यांमध्ये माध्यमिक, प्राथमिक, आदिवासी, दिव्यांग, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर यांचा समावेश होणार आहे. तरी सदरचे निकषानुसार जिल्हास्तरासाठी निवड झालेल्या सर्व शाळांनी सहभागी व्हावे तसेच प्रदर्शनाला जास्तीत जास्त विद्यार्थी व पालक यांनी भेट देऊन नवीन संकल्पना व प्रतिकृतींची माहिती घ्यावी असे आवाहन जिल्हा परिषद ठाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती ललिता दहितुले यांनी केले आहे.

## क्रिकेट सामन्यामधून सातपाटी येथे एक हात मदतीचा




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(ऋषीकेश जाधव)**

पालघर सातपाटी येथील होतकरू तरूणांनी लोकशक्ती ग्रुप सातपाटी आयोजित मदतीचा हात चषक क्रिकेट सामने भरविण्यात आले होते. त्या टूर्नामेंट मधून मिळणारा आर्थिक नफ्यातून बेघर आणि गरजू लोकांना स्वेटर, चटई, चादर इत्यादी वस्तू चे वाटप करणार असून. सामाजिक बांधिलकी म्हणून, लोकशक्ती ग्रुप सातपाटी आयोजित एक हात मदतीचा चषक क्रिकेट टूर्नामेंट मध्ये मदतीचा हात म्हणून. रॉयल शैक्षणिक व सामाजिक संस्थेला पुण्याच्या कामात हातभार लावण्याची संधी मिळाली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष : वृषभ वारे (युवा उपशहर अध्यक्ष शिवसेना), उपाध्यक्षः अमित जाधव, सचिव : राहुल सांबरे, कार्याध्यक्षः अक्षय गायकवाड, संपर्क प्रमुखः यश धोडी, शिवसेना उपनेत्या ज्योती ताई मेहेर व राहुल पाटील (समाजसेवक) उपस्थित होते.

## सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुंबई(प्रतिनिधी)**

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानानुसार १६ कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजय वैद्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी महानगरपालिकेचे मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या हस्ते सदर सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीचे



धनादेश पत्र, शाल व पुस्तक देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि त्यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमातीच्या तिसरा मजल्यावरील कॉन्फ़रन्स हॉल येथे संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमात १) श्री. अशोक बाळाराम थेटे (लिपीक), २) श्रीम. मीना नारायण तांबे (लिपीक), ३) श्री. अनिस गुलाब मोमीम (वाहनचालक), ४) श्री. अरुण चाऊ जाधव (सफाई कामगार), ५) श्री. दिनेश चंद्राकांत चव्हाण (सफाई कामगार), ६) श्रीम. ताराबाई हरिचंद्र वाणी (सफाई कामगार), ७) श्री. सुभाष लोल्या जाधव (सफाई कामगार), ८) श्री. नारायण तुळशिराम जाधव (सफाई कामगार), ९) श्री. राजेश गोविंद जाधव (सफाई कामगार), १०) श्री. अनिल विठ्ठल जाधव (सफाई कामगार), ११) श्री.धर्मेंद्र काशिराम सकपाल (सफाई कामगार), १२) श्री. गणेश तुकाराम साळवी (सफाई कामगार), १३) श्री. जनार्दन मंगल्या जाधव (सफाई कामगार), १४) श्री. दयानंद बाबु गायकवाड (सफाई कामगार), १५) श्री. तुकाराम शंकर वाणी (सफाई कामगार), १६) श्रीम. सुशिला सुरेश जाधव (सफाई कामगार), अशा १६ कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या वतीने आज निरोप देण्यात आला. याप्रसंगी मा. सहा. आयुक्त (प्रशासन) तथा अंतर्गत लेखा परिक्षक श्री. नंदकुमार चौधरी, आस्थापना विभाग प्रमुख श्री. राजेश गोसावी, पर्यावरण विभाग प्रमुख श्री. अनिल आव्हाड व महानगर पालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

## जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे वार्षिक पारितोषिक व स्नेहसंमेलन संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे कोळी समाज विद्या संकुल मोरा येथे प्राथमिक शाळा व न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने पारितोषिक वितरण समारंभ व वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत गीताने केली . प्रास्ताविक मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांनी केले तर प्राथमिकचे मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रामनाथ बामा कोळी (माजी मुख्याध्यापक माध्यमिक मोरा) यांनी भुषवले. विशेष उपस्थिती प्रीतम जनार्दन म्हात्रे अध्यक्ष जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेल, प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत गजानन पाटील (माजी चेअरमन उरण प्राथमिक





शिक्षक सहकारी पतपेढी सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कोळी ट्रस्टचे सचिव जयवंत मढवी राजाराम पाटील, किरण सर्जेराव शिंगटे, जवींद्र कोळी दिलीप मुंबईकर, परशुराम लक्ष्मण कोळी सर्वांचे पुष्पगुच्छ व शाळ, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी रांगोळी प्रदर्शन व विज्ञान प्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घाटन करून विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना शैक्षणिक व क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वाटप करण्यात आली.प्रमुख पाहुणे प्रशांत पाटील यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व शिक्षणाचे महत्त्व गोष्टी रूपाने पटवून दिले. तसेच प्रीतम म्हात्रे यांनी आपल्या मनोगतामधून विद्यार्थ्यांना व पालकांना शालेय भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती संदर्भात मोलाचे मार्गदर्शन करून परीक्षेत व खेळांमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. रामनाथ कोळी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रम प्रसंगी असलेल्या पाहुण्यांनी शाळेला भरभरून मदत दिली. राजेंद्र घनःश्याम कोळी यांनी शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित संच दिले. रा.ग गावंड कला, क्रीडा शैक्षणिक व सामाजिक संस्थेमार्फत शाळेतील २५० विद्यार्थ्यांना ओळखपत्र , सुप्रिया मुंबईकर यांच्याकडून एक्वागार्ड, तसेच पाहुण्यांमार्फत सर्व विद्यार्थ्यांना भोजन व्यवस्था केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे सुधीर मुंबईकर साईनाथ गावंड परशुराम कोळी चंद्रकांत कोळी, अनिल पाटील ,सुगिंद्र म्हात्रे विद्यार्थी प्रतिनिधी नीता झळकी,गौरेश धुळे, मिताली सुतार, रामू विश्वकर्मा, तसेच शाळा समिती सदस्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मनोज म्हात्रे, सत्यवान मर्चंडे, स्वप्निल नागमोती यांनी केले तर अनिल पाटील यांनी आभार मानले .

## ५ जानेवारी रोजी राज्यस्तरीय शिक्षण परिषद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई व शिक्षण विकास मंचाच्या वतीने रविवार ५ जानेवारी रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे पंधरावी राज्यस्तरीय शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली आहे.

राज्यात नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या संदर्भात राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ तयार करण्यात आला. या विषयावर राज्यस्तरीय शिक्षण परिषदेत शिक्षक, मुख्याध्यापक, अभ्यासक, शिक्षण तज्ज्ञ, पत्रकार, अधिकारी, पालक, विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच उपस्थितांना राज्य अभ्यासक्रमा आराखडा-२०२४ या विषयावर चर्चेत सहभागी होता येणार आहे. राज्यस्तरीय शिक्षण परिषदेचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक, प्राचार्य डॉ सुनीलकुमार लवटे यांचे हस्ते होणार असून यशवंतराव चव्हाण सेंटरच्या निमंत्रक खासदार सुप्रिया सुळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्‌घाटना नंतरच्या दुसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार तसेच डॉ. कुमुद बन्सल गुणवंत शिक्षक पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जातील. तसेच राज्यस्तरीय शिक्षण परिषदेच्या अनुषंगाने यावर्षी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरवले जाईल. मध्यान्हानंतरच्या सत्रात राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ या विषयाच्या विविध पैलूंवर डॉ. विकास गरड, डॉ. धनवंती हर्डीकर व डॉ. योगेश कुलकर्णी हे उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. राज्यस्तरीय शिक्षण परिषदेला उपस्थित राहण्यासाठी नोंदणी आवश्यक असून शिक्षण प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबईच्या वतीने शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी केले आहे. बुलडाणा जिल्ह्यातून शिक्षकांनी नोंदणी करून उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षण विकास मंचचे जिल्हा समन्वयक अरविंद शिंगाडे व किशोर भागवत यांनी केले आहे.

## ग्रामीण भागात घरकुल योजनेला बळकटी देणार

### - ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)**

येणाऱ्या काळात ग्रामीण भागातील मूलभूत सोयी-सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार गरिबांना घरकुल मिळण्यासाठी, या योजनेला अधिक बळकटी देण्यासाठी १०० दिवसांत २० लाख घरकुलांना मान्यता देण्याचा संकल्प असल्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.ग्रामविकास मंत्री श्री. गोरे मंत्रालयात मंत्रीपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर माध्यमांशी बोलत होते. यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार सचिन कांबळे-पाटील, श्री. गोरे यांच्या पत्नी सानिया गोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. ग्रामविकास मंत्री श्री. गोरे म्हणाले, ग्रामीण भागात काम करण्याची संधी मिळाल्याने मंत्रीपदाच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासविषयक विविध संकल्पना राबवून विभागाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येणार आहे. १०० दिवसांचा कार्यक्रम समोर ठेवून काम करणार असून राज्याला प्रथमच २० लाख घरांचे उद्दिष्ट मिळाले आहे. १०० दिवसात या घरांना मान्यता देवून कामे चालू करण्यात येतील. तसेच प्रधानमंत्री यांची महत्वाकांक्षी लखपती दीदी योजना १०० दिवसात राबविण्याचा संकल्प आहे. ग्रामीण भागातील महिलांचे बचत गटाच्या माध्यमातून सक्षमीकरण करण्यासाठी ५० लाख अतिरिक्त लखपती दीदी करणार असल्याचेही श्री. गोरे यांनी सांगितले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी